## तुझ्या आठवणी

हिरव्याजळ तलावाच्या काठी तुझ्या डोळयातील लकाकी
निळया विजेची चमक,  जणू सळसळती मासळी

काजळलेल्या डोंगराच्या पाठी मंदगती चांदणं
तुझ्या सावळया कांतीवर ओली चंदेरी झालरं

शांत अशा आवाजात एकटयाच पक्षाची आरळं
तुझ्या हळुवार घनदाट कुशीत माझ्या मनाचं मुंडावळं

एक  टपोरा थेंब तुझ्या ओठांवर टिपला
तहानलेला वारकरी तुझ्या आश्रयाला आला

असं हे तुटक  चित्र, तसं ते तुटक  चित्र
ओघवत्या वाऱ्याचं गहिऱ्या पाण्यातलं प्रतिबिंब

कुठे घेऊन जाऊ मी हा आठवणींचा खेळ
तुझ्या ओंजळीत राहू दे माझ्या आयुष्यफुलांची माळ

नितीन अंतुरकर

४ फेब्रुवारी, २००७